# ईश्वराचा शोध

## ईश्वरावरील श्रद्धांच्या श्रेणी

बहुतेक व्यक्तींना ईश्वर म्हणून कोणीतरी अस्तित्वात आहे अशी यत्किंचितही शंका येत नाही, आणि त्यामुळे ईश्वर या विषयात त्यांना फारसे स्वारस्य नसते. इतर काही व्यक्ती अशा असतात की, ज्या रूढी-परंपरा यांच्या दडपणामुळे या ना त्या अशा कोणत्या तरी श्रद्धेला चिकटून राहतात आणि त्यांच्या भोवतालच्या परिस्थितीस अनुसरून ईश्वराच्या अस्तित्वावर विश्वास ठेवू लागतात. त्यांची ही श्रद्धा त्यांना काही धार्मिक विधी, समारंभ किंवा परंपरागत समजुती यांना जखडून ठेवण्याइतपतच बळकट असते. त्यामुळे, समग्र जीवनाकडे पाहण्याच्या व्यक्तीच्या दृष्टिकोनात आमूलाग्र बदल घडवून आणण्यासाठी जे एक नवचैतन्य आवश्यक असते, ते तिच्या ठिकाणी अभावानेच आढळते. आणखी इतर काही व्यक्ती अशा असतात की, ज्यांच्या मनावर तात्त्विक विचारांचा पगडा असतो; त्यामुळे ईश्वराच्या अस्तित्वावर विश्वास ठेवण्याकडे त्यांच्या मनाचा जो कल होतो, तो एकतर त्यांच्या स्वतःच्या वैचारिक निष्कर्षांमुळे, किंवा इतर विचारवंतांच्या प्रतिपादनाद्वारे. त्यांच्या दृष्टीने, ईश्वर म्हणजे फार तर एखादे प्रमेय नाहीतर एखादे बौद्धिक तत्त्व होय. अशा प्रकारची भावनेच्या ओलाव्याचा स्पर्शही नसलेली श्रद्धा ही मुळातच ईश्वराचा शोध गंभीरपणे हाती घेण्यासाठी केव्हाही पुरेशी प्रेरणा देऊ शकत नाही. अशा व्यक्तींचे ईश्वरविषयक ज्ञान हे आध्यात्मिक स्वानुभवांवर आधारलेले नसते; त्यांच्या दृष्टीने ईश्वर हे तळमळीचे किंवा मोठ्या प्रयासाचे उद्दिष्ट नसते.

## खरा साधक आध्यात्मिक सत्य- तत्त्वांच्या प्रत्यक्ष ज्ञानाच्या शोधात

खऱ्या साधकाचे समाधान ना आध्यात्मिक सत्य-तत्त्वांबाबतच्या ऐकीव माहितीवर आधारलेल्या ज्ञानाने होते, ना केवळ तार्किक ज्ञानाने. त्याच्या दृष्टीने आध्यात्मिक सत्य-तत्त्वे म्हणजे आळशीपणाने केवळ वैचारिक फवारे सोडीत बसण्याचे उद्दिष्ट नव्हे, कारण या सत्य-तत्त्वांचा स्वीकार किंवा अव्हेर करण्याच्या कृतीला त्याच्या आंतरिक जीवनाच्या दृष्टीने फार मोठा अर्थ असतो, आणि म्हणूनच त्यांच्या प्रत्यक्ष ज्ञानाविषयी त्याचा कटाक्ष असतो. या संदर्भात एका थोर साधूच्या जीवनातील प्रसंगाचे उदाहरण देता येईल. एके दिवशी तो साधू आध्यात्मिक मार्गात बरीच प्रगती झालेल्या आपल्या एका मित्राबरोबर आध्यात्मिक विषयांवर चर्चा करीत होता. या चर्चेमध्ये ते व्यग्र असतानाच, त्यांच्या जवळून पुढे जात असलेल्या एका प्रेतयात्रेने त्यांचे लक्ष वेधून घेतले. [ती पाहून] '' हा शरिराचा अंत आहे, आत्म्याचा नव्हे,'' असे तो मित्र उद्गारला. यावर ''तू कधी आत्मा पाहिला आहेस तरी काय ?'' साधूने प्रश्न केला. ''नाही'', तो मित्र उत्तरला. यावर त्या साधूने आत्म्याबद्दल साशंकता व्यक्त केली, कारण स्वानुभवावर आधारलेल्या ज्ञानाबद्दल तो आग्रही होता.

## साधक मोकळ्या मनाचा असतो

जरी साधक दुसऱ्यांकडून मिळणाऱ्या वा केवळ तार्किक ज्ञानावर संतुष्ट नसतो, तरी आपल्या अनुभवाच्या कक्षेत येऊ न शकणारी अशी आध्यात्मिक सत्यतत्त्वे प्रत्यक्षात असण्याच्या शक्यतेबाबत तो आपल्या मनाची कवाडे बंद ठेवत नाही. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचे म्हणजे, त्याला स्वतःच्या वैयक्तिक अनुभवाच्या मर्यादांची जाणीव असते, आणि त्यामुळे सर्व शक्यता त्याच्या [स्वानुभवाच्या] मापदंडाच्या निकषावर घासून पाहण्याचे तो टाळतो. त्याच्या अनुभवकक्षेच्या बाहेर ज्या ज्या म्हणून गोष्टी असतात त्या सर्वांच्या बाबतीत तो आपले मन खुले ठेवतो. ज्याप्रमाणे तो केवळ सांगोवांगीच्या माहितीवर विश्वासून त्यांचा सत्य म्हणून स्वीकार करीत नाही, त्याचप्रमाणे तो त्यांना घाईने असत्य म्हणून नाकारतही नाही. बऱ्याच वेळा अनुभवाच्या मर्यादेचा कल हा कल्पनाशक्तीच्या कार्यक्षेत्राला मिळणारा वाव कमी करण्याकडे असतो, आणि म्हणूनच, भूतकालातील आपल्या अनुभवाच्या

कक्षेत जी सत्ये येऊ शकली, त्यांच्याशिवाय दुसरी सत्य-तत्त्वे अस्तित्वात असूच शकणार नाहीत, असा माणसाला विश्वास वाटू लागतो. पण बहुधा असे दिसून येते की, त्याच्या स्वतःच्या जीवनात अशा प्रकारचे काही प्रसंग किंवा घटना घडतात की, ज्यांच्यामुळे आपल्या दुराग्रही मतांचा आपणच उभा केलेला बांध फोडून त्याला बाहेर पडावे लागते, तसेच खऱ्या अर्थाने दिलखुलास बनावे लागते.

## उदाहरणादाखल एक कथा

स्थित्यंतराच्या या टप्प्याबद्दलचे एक उदाहरण, वर ज्याचा उल्लेख केला आहे त्या राजपुत्र असलेल्या साधूच्या जीवनातील एक कथा सांगून देता येईल. वर सांगितलेला प्रसंग घडून गेल्यावर काही दिवसांनी, तो घोड्यावर बसून रपेट करीत असताना, त्याने एका पादचारी माणसाला आपल्याकडे येताना पाहिले. पादचाऱ्याच्या उपस्थितीने घोड्याच्या मार्गात अडथळा निर्माण झाल्यामुळे, साधूने उर्मटपणाने त्या माणसाला आपल्या मार्गातून दूर होण्यास फर्मावले. यावर पादचाऱ्याने तसे करण्यास नकार दिल्यामुळे, तो साधू घोड्यावरून खाली उतरला. मग दोघांत पुढील संवाद झाला : ''काय रे, तू आहेस तरी कोण ?'' पादचाऱ्याने विचारले. '' मी राजपुत्र आहे'', साधू उत्तरला. ''पण मी तर तुला राजपुत्र म्हणून ओळखत नाही,'' असे म्हणून तो पादचारी पुढे बोलू लागला, ''जेव्हा तू राजपुत्र असल्याचे मला कळून येईल, तेव्हाच तू राजपुत्र असल्याचे मी मान्य करीन, एरवी नाही.'' या वादामुळे त्या साधूच्या डोक्यात सत्य परिस्थितीविषयी एकदम प्रकाश पडला; ती म्हणजे, जर पादचाऱ्याला स्वानुभवाने मी राजपुत्र असल्याचे माहीत नसूनदेखील मी जर प्रत्यक्षात राजपुत्र असू शकतो, तर त्याच प्रकारे मला स्वानुभवाने ईश्वर ठाऊक नसूनदेखील तो प्रत्यक्षात अस्तित्वात असू शकेल. आता ईश्वर अस्तित्वात असणाच्या शक्यतेबाबत त्याचे मन खुलेपणाने विचार करू लागल्यामुळे, तो तत्परतेने त्या प्रश्नाचा सोक्षमोक्ष लावण्याच्या मागे लागला.

## ईश्वराच्या अस्तित्वाविषयी सामान्य माणूस उदासीन

ईश्वर एक तर अस्तित्वात आहे किंवा अस्तित्वात नाही. जर तो अस्तित्वात असेल तर त्याचा शोध घेणे पूर्णपणे समर्थनीय ठरते, आणि जरी समजा तो

अस्तित्वात नसेल, तरी त्याचा शोध घेण्यामुळे काहीच नुकसान होत नाही. परंतु माणूस, ईश्वराचा खरा शोध हे स्वेच्छेने व उत्स्फूर्त आनंदाने करावयाचे कार्य आहे, या समजुतीने त्याकडे सहसा वळत नाही. ऐहिक जगातील जे इंद्रिय-विषय त्याला भुरळ घालीत असतात व ज्यांच्यापासून तो आपल्या मनाला पराङ्मुख करू शकत नाही, त्यांच्याबद्दल भ्रमनिरास झाल्यावरच तो या शोधाकडे खेचला जातो. सर्वसामान्य मनुष्य हा या स्थूल जगातील त्याच्या कर्मांतच व्यग्र होऊन गेलेला असतो. अंतर्यामी खोलवर दडलेल्या सत्याच्या अस्तित्वाविषयी तिळमात्रही शंका न येता तो त्यातील [स्थूल जगातील] असंख्य प्रकारची सुखदुःखे भोगत जीवन कंठत असतो. इंद्रियसुखे भोगण्याचा व विविध प्रकारची दुःखे टाळण्याचा तो त्याला जमेल तितका जास्तीत जास्त चांगला प्रयत्न करीत राहतो.

## विचारांना चालना देणारे प्रसंग

''खा, प्या आणि मजा करा'' हे सर्वसामान्य व्यक्तीचे [जीवनविषयक] तत्त्वज्ञान असते. परंतु अविरतपणे इंद्रियसुखाचा शोध घेत असताना, एकीकडे ती दुःखे, यातना सर्वस्वी टाळू शकत नाही, तर दुसरीकडे इंद्रिय-सुखांचा आस्वाद घेण्यात ती जरी यशस्वी झाली, तरी बऱ्याच वेळा त्यांचा तिला उबग येऊ लागतो. अशा रीतीने विविध अनुभवांच्या चक्रातून रोज जात असताना, कधीतरी असा प्रसंग उद्भवतो की, ज्यामुळे ती स्वतःला प्रश्न विचारू लागते, ''या सर्वांचा शेवट होणार आहे तरी कशात आहे बरे ?'' जिला तोंड देण्याची मानसिक तयारी नाही अशी एखादी अनुचित घटना घडल्यामुळे अशा प्रकारचा प्रश्न उद्भवू शकेल. कदाचित हा [प्रसंग] कोणत्या तरी खात्रीशीर वाटणाऱ्या अपेक्षापूर्तीचा भंग असू शकेल, नाहीतर त्याच्या परिस्थितीतील असा महत्त्वाचा बदल असेल की ज्यामुळे आमुलाग्र फेरजुळणी करणे व रूढ, प्रस्थापित आचारविचारांच्या पद्धतीचा त्याग करणे तिला भाग पडत असेल. बहुधा एखादी तीव्र इच्छा वा वासना तृप्त न झाल्याच्या वैफल्यातून अशा प्रकारचा प्रसंग उद्भवतो. जर या तीव्र इच्छेला अशा पेचप्रसंगाला तोंड द्यावे लागत असेल की ज्यामुळे तिची तृप्ती होण्याची तिळमात्र आशा नाही, तर मनाला एवढा धक्का बसतो की, ते आतापर्यंत निःशंकपणे स्वीकारलेला जीवनमार्ग यापुढेही स्वीकारून तसाच चालू ठेवण्यास तयार होत नाही.

## हताशपणाची न गुंतविलेली शक्ती विध्वंसक; दैवी हताशपणा सर्जनशील

अशा परिस्थितीत माणूस हताशपणाच्या आत्यंतिक टोकाला जाण्याचा संभव असतो, आणि जर का मानसिक बिघाडामुळे निर्माण झालेली शक्ती अनियंत्रित व दिशाहीन राहिली, तर ती गंभीर अशा मानसिक विकृतीला किंवा आत्महत्येच्या प्रयत्नांना कारणीभूत होण्याची शक्यता असते. ज्यांच्या ठिकाणी हताश मनोवृत्तीबरोबर जोडीने अविचारीपणाही असतो, त्यांच्यावरच बहुधा अशा प्रकारचे संकट कोसळते, कारण ते विकारांना मुक्तपणे [स्वतःवर] पूर्ण वर्चस्व गाजवू देतात. योग्य प्रकारे गुंतवून न ठेवली गेलेली हताश मनोवृत्तीची दिशाहीन शक्ती ही केवळ विध्वंसाला निमंत्रण देते. मात्र अशाच प्रकारच्या परिस्थितीमध्ये एखाद्या विचारी माणसाचा हताशपणा हा परिणामांच्या दृष्टीने सर्वस्वी भिन्न असतो. कारण तो जी शक्ती प्रगट करतो तिचा, एखादे विशिष्ट उद्दिष्ट साध्य करण्यासाठी चतुराईने वापर केला जातो व तिला योग्य दिशा दिली जाते. अशा ***दैवी हताशपणाच्या*** क्षणी माणूस जीवनाचे अंतिम ध्येय शोधून काढण्याचा व ते साध्य करण्याचा महत्त्वाचा निर्णय घेतो. अशा रीतीने चिरंतन मूल्यांसाठी घ्यावयाचा शोध अस्तित्वात येतो. यापुढे, जो प्रयत्न करूनही थांबविता येत नाही, असा ज्वलंत प्रश्न म्हणजे, ''या सर्वाची परिणती कशात होणार बरे ?''

## दैवी हताशपणा हा आध्यात्मिक जागृतीचा प्रारंभ

अशा प्रकारे, माणसाची मानसिक शक्ती जेव्हा जीवनाचे अंतिम ध्येय शोधण्यावर केंद्रित होते, तेव्हा तो हताशपणातून निर्माण होणारी ऊर्जा सर्जनशीलतेने [विधायक पद्धतीने] वापरतो. यापुढे तो या ऐहिक जीवनातील क्षणभंगुर गोष्टींनी संतुष्ट होऊ शकत नाही; कारण, आतापर्यंत त्याने जी सामान्य जीवनमूल्ये निःशंक मनाने स्वीकारलेली असतात, त्यांच्या सत्यतेबद्दल तो पूर्णपणे साशंक बनतो. पडेल ती किंमत मोजून अंतिम सत्य शोधून काढणे हीच त्याची एकमात्र इच्छा बनते आणि या सत्यापेक्षा कमी पडणाऱ्या कोणत्याही गोष्टीने त्याचे समाधान होऊ शकत नाही. दैवी हताशपणा हा आध्यात्मिक जागृतीचा प्रारंभ होय, कारण त्याच्यामुळे ईश्वरसाक्षात्कारासाठी लागणाऱ्या व्याकुळतेचा उदय होतो. दैवी हताशपणाच्या क्षणी, जेव्हा पायाखालची वाळू पूर्णपणे सरकत असल्यासारखे वाटते, तेव्हा आपल्या

जीवनाच्या दृष्टीने सर्वात महत्त्वाची असलेली [त्या जीवनाच्या] पडद्यामागील गोष्ट निश्चितपणे जाणून घेण्यासाठी कोणताही धोका पत्करण्याचा निर्णय तो घेतो.

## एक तर ईश्वर पाहिजे, नाहीतर काहीच नको

एरवी मनाला दिलासा देणाऱ्या नेहमीच्या सर्व गोष्टी त्याच्या बाबतीत निष्फळ ठरतात, परंतु त्याच वेळी त्याचा आंतरिक आवाज, जीवन हे सर्वस्वी अर्थशून्य आहे, या भूमिकेशी पूर्णपणे जुळवून घेण्यास साफ नकार देतो. जर त्याने अंतर्यामी दडून राहिलेले व त्याला आतापर्यंत अज्ञात असलेले असे काहीतरी सत्य अस्तित्वात असल्याचे मानले नाही, तर मग [त्याच्या दृष्टीने] जगण्यायोग्य असे अजिबात काहीही उरणार नाही. त्याच्यासमोर केवळ दोनच पर्याय राहतात : एकतर प्रेषितांनी ईश्वर म्हणून ज्याचे वर्णन केलेले आहे असे काहीतरी आध्यात्मिक सत्य अंतर्यामी दडलेले असले पाहिजे, नाहीतर मग सर्व काही अर्थशून्य आहे. माणसाच्या व्यक्तिमत्वाच्या समग्रतेला यातील दुसरा पर्याय पूर्णतया अस्वीकार्य वाटतो; त्यामुळे त्याने पहिल्या पर्यायासाठीच प्रयत्न करणे आवश्यक ठरते. अशा रीतीने, या ऐहिक जगातील व्यवहारांमुळे जेव्हा माणूस टेकीस येतो तेव्हाच तो ईश्वराकडे वळतो.

## मानलेल्या ईश्वरत्वाच्या प्रकाशात अनुभवांचे पुनर्मूल्यमापन

आता अंतर्यामी दडलेले जे सत्य तो अस्तित्वात असल्याचे मानतो त्याच्याकडे थेट जाऊन पोहोचण्याचा प्रवेशमार्ग उपलब्ध नसल्याने, मौलिक अशा परात्पराकडे जाऊन पोचण्यासाठी इतर काही साधनमार्ग शक्य आहेत का, याच्या चाचपणीसाठी तो आपले नेहमीचे अनुभव तपासून पाहू लागतो. अशा प्रकारे, अध्यात्म-मार्गासंबंधी काहीतरी प्रकाश दिसावा [काहीतरी माहिती मिळावी] या उद्देशाने तो परत आपल्या दैनंदिन अनुभवांकडे वळतो. असे करणे म्हणजे प्रत्येक गोष्टीकडे अगदी एका नव्या दृष्टिकोनातून पाहण्यासारखे व प्रत्येक अनुभवाचा अगदी नवा अर्थ लावण्यासारखे असते. आता तो, हा अनुभव काय आहे या विचारावरच केवळ न थांबता, अंतर्यामी दडलेल्या जीवनध्येयाकडे करावयाच्या वाटचालीच्या दृष्टीने त्याचा अर्थ काय आहे, हे समजून घेण्याला विशेष महत्त्व देऊ लागतो. त्यामुळे तो केवळ अनुभव घेऊनच थांबत नाही, तर त्याच्या आध्यात्मिक मूल्याचा ठाव घेण्याचा प्रयत्न

करतो. अनुभवाच्या काळजीपूर्वक केलेल्या पुनर्मूल्यमापनाचा परिणाम असा होतो की, आपला नवा शोध हाती घेण्यापूर्वी जी अंतर्दृष्टी त्याला प्राप्त झालेली नसते, ती आता प्राप्त होते. प्रत्येक अनुभवाच्या पुनर्मूल्यमापनामुळे थोडीशी नवी आध्यात्मिक जाण निर्माण होते, आणि या आध्यात्मिक जाणतेपणात जी प्रत्येक भर पडत जाते, तिच्यामुळे जीवनाकडे पाहण्याच्या माणसाच्या दृष्टिकोनात स्वाभाविकपणे फरक पडत जातो. याप्रमाणे – ईश्वरासाठी किंवा अंतर्यामी दडलेल्या आध्यात्मिक सत्यासाठी – केवळ बौद्धिक पातळीवर चाललेल्या शोधाची प्रतिक्रिया त्याच्या प्रत्यक्ष व्यावहारिक जीवनात उमटते. त्याचे जीवन म्हणजे, बुद्धीने आकलन केलेल्या आध्यात्मिक जीवनमूल्यांचा एक खरोखरी जिवंत असा वास्तवातील प्रयोग बनतो.

## ईश्वराचा शोध म्हणजे स्वतःच्या आत्म्याशी येऊन पोचणे होय

आपल्या प्रत्यक्ष जीवनाशी संबंधित असा हा हुशारीने व विशिष्ट उद्देशाने केलेला प्रयोग साधक जितका अधिकाधिक पुढे चालू ठेवतो तितकी तितकी जीवनाच्या खऱ्या अर्थासंबंधीची त्याची आकलनशक्ती अधिकाधिक परिपक्व होत जाते; आणि सरतेशेवटी, त्याला आढळून येते की, आपल्या अस्तित्वाचे पूर्णतया परिवर्तन होत असून, जीवन त्याच्या सत्य स्वरूपात जसे आहे त्या स्वरूपातील त्याच्या महत्त्वाचे यथार्थ आकलन आपल्याला होत आहे. जीवनाचे स्वरूप व मौलिकता यांच्याविषयी अगदी स्वच्छ व निरामय दृष्टी प्राप्त झाल्यामुळे त्याला कळून येते की, ज्या ईश्वराच्या शोधासाठी आपण जिवाचा इतका आटापिटा करीत आहोत, तो आपल्याहून भिन्न किंवा दडून बसलेला किंवा परका असा कोणी नाही. तो केवळ एक अनुमान नसून [जीवनामागील] साक्षात अंतिम सत्य आहे. अगदी स्वच्छ दृष्टीने पाहिले जाणारे प्रत्यक्ष सत्य तो आहे – तेच ते सत्य की ज्याचा तो एक अंश आहे, ज्याच्यामध्ये त्याचे संपूर्ण अस्तित्व सामावलेले आहे आणि ज्याच्याशी, वास्तविक पाहता, तो एकरूप आहे.

त्यामुळे, सर्वस्वी नवीन अशा कोणत्या तरी गोष्टीचा शोध घेण्यासाठी म्हणून जरी त्याने मुळात प्रारंभ केलेला असला, तरी प्रत्यक्षात मात्र तो एका प्राचीन गोष्टीसंबंधीच्या नवीन आकलनापाशी येऊन पोहोचतो. आध्यात्मिक विकासाचा प्रवास म्हणजे, माणसाजवळ जे पूर्वी नव्हते ते त्याला मिळवून देणाऱ्या, किंवा जे तो

पूर्वी नव्हता ते होणाऱ्या ठिकाणी येऊन पोहोचणे नव्हे. त्याच्यामध्ये [आध्यात्मिक विकासामध्ये] माणसाच्या स्वतःबद्दलच्या व जीवनाबद्दलच्या अज्ञानाचे निर्मूलन, तसेच आध्यात्मिक जागृतीनंतर हळूहळू विकास पावत जाणारा जाणतेपणा, यांचा अंतर्भाव होतो. ईश्वराचा शोध म्हणजे स्वतःच्या आत्म्याकडे येऊन पोहोचणे होय.

✤✤